श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान
तुळजापूर, जि. धाराशिव (महाराष्ट्र)-४१३ ६०१
दूरध्वनी : ०२४७१ - २४२०३१

Shri Tuljabhavani Temple Trust
Tuljapur, Dist. Dharashiv (Mah.) - 413 601
Tel. : 02471 - 242031

Web Site: https://www.shrituljabhavani.org E-mail : shreetuljabhavanitemple@gmail.com
ISO : 9001 : 2008

दिनांक-:28/08/2024

**प्रेसनोट**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर आस्थापनेवर भरावयाच्या लिपीक टंकलेखक व भांडारपाल या पदासाठी मराठी 30 श.प्र.मि. व इंग्रजी 40 श.प्र.मि. या विषयाची संगणक टंकलेखन चाचणी दिनांक 31/08/2024 रोजी सकाळी 10-00 वाजता श्री तुळजाभवानी मंदिर अभियांत्रिकी महाविदयालय, तुळजापूर येथे होणार आहे. याबाबत सर्व संबधीत पात्र उमेदवार यांनी याची दखल घ्यावी.

**परीक्षेचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.**

1) परीक्षा केंद्रावर येताना उमेदवारांनी परीक्षेचे प्रवेश पत्र आणि आधार कार्ड/पॅनकार्ड/ड्रायव्हींग लायसन्स यापैकी कोणेही एक फोटो ओळखपत्र मुळ प्रत व एक झेरॉक्स प्रत सोबत आणणे बंधनकारक आहे.
2) परीक्षेच्या वेळेपुर्वी 45 मिनीटे परीक्षा केंद्रावर हजर राहणे बंधनकारक राहील. प्रत्येक उमेदवाराने संगणक लॅबमध्ये असताना आपल्या बैठक क्रमांकाच्या चढत्या क्रमांकानुसार बसावयाचे आहे. लॉगिन करण्यापुर्वी उमेदवारानी कीबोर्ड व माऊस सुस्थितीत असल्याची पुर्ण खात्री करावी.
3) किबोर्डची चाचणी उमेदवारानी परीक्षा सुरु होण्यापुर्वी संगणकावर करुन घ्यावी.
4) परीक्षा सुरु करण्यापुर्वी विद्यार्थ्यांना 2 मिनीटाचा ट्रायल पॅसेज घेणे अनिवार्य राहील
5) मराठी 30 श.प्र.मि. व इंग्रजी 40 श.प्र.मि. या विषयांची संगणकावर आधारी टंकलेखक कौशल्य चाचणी घेण्यांत येणार आहे.
6) मराठी 30 श.प्र.मि. व इंग्रजी 40 श.प्र.मि. या विषयांसाठी 07 मिनिटांचे दोन गती उतारे घेण्यांत येणार आहेत.
7) मराठी परीक्षेसाठी Unicode-Remington Marathi Mangal Font चा वापर करावी
8) ISM बाबतचे Font Setting विदयार्थ्यांना केंद्रसमन्वयकाकडून उपलब्ध करुन देण्यांत येणार असल्याने विद्यार्थ्यांनी स्वत: ISM बाबत कोणतेही सेटींग बदलु नये
9) प्रत्येक उतारा 40 गुणांचा असणार आहे. एकुण 80 गुणांची परीक्षा घेण्यांत येणार आहे. सदर चाचणीमध्ये पात्र होण्यासाठी उमेदवारांना किमान 40% गुण म्हणजेच किमान 32 गुण मिळवीणे बंधनकारक राहील.
10) एकाच सत्रामध्ये एका पाठोपाठ दोन्ही विषयांची परीक्षा घेण्यांत येईल. एका विषयाची कौशल्य चाचणी नंतर लगेचच दुस-या विषयाची कौशल्य चाचणी घेण्यांत येईल
11) प्रत्येक विषयास किमान 16 गुण मिळवीणे आवश्यक आहे. प्रत्येक चुकीसाठी 1 गुण कमी करण्यांत येईल. (स्पेलींगमध्ये चुक/शब्द वगळणे/उता-यात नसलेला शब्द टाईप करणे अशा चुकांची संख्या जर 14 पेक्षा अधिक असेल तर विद्यार्थी अनुत्तीर्ण होईल) एखादया विषयास 16 पेक्षा कमी गुण मिळाल्यास उमेदवार अपात्र ठरेल.
12) कोणताही चुकीचा शब्द दुरुस्त करण्यासाठी बॅकस्पेस कळ (Backspace Key) आणि नेवीगेशन (Arrow) कळ (Key) चा वापर करता येईल.
13) गती उता-यासाठी जी कांही वेळ निर्धारीत वेळ दिलेली असेल त्या वेळेमध्ये गती उतारा टंकलिखीत करावयाचा आहे. उता-याचे टंकलेखनाची वेळ संपल्यानंतरच SUBMIT बटन कार्यान्वित होईल. SUBMIT बटन न दावल्यास किंवा राहुन गेल्यास गती उतारा आपोआप SUBMIT होईल.

वरील प्रमाणे होणारे परीक्षेच्या स्वरुपाबाबत प्रत्येक उमेदवाराने नोंद घेवून कार्यवाही अनुसरावी.

**जिल्हाधिकारी, धाराशिव**
**तथा अध्यक्ष**
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर